NOTARY
RAJESH RAMAKANT NIRGUDE
AREA MAH
REGD. NO. 8142/2010
EXP. DT. 19/07/2026
GOVERNMENT OF INDIA

Regarding sanction of Permission (Approval) for Autonomous School (For the Academic Year 2018-19 under Maharashtra Autonomous School (Establishment & Regulation) Rules 2012 for Establishment of New School & Upgradation of existing status

**Government of Maharashtra**
**School Education & Sports Department**
**Govt Decision No.SFS-1019/C.No.481/SM-2 Madam Cama Road,Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,Mumbai 400032**

Dated – 13/06/2019

INTRODUCTION

(1) The proposal of the School Billbong High International School S.N.169/170,Malwadi Road, Hadapsar, Tal.Haveli,Dist. Pune run by Lina Ashar Foundation Mumbai was submitted & the matter was under consideration to accord sanction to the said proposal.

GOVT.DECISION

(2,1) The Govt. hereby accord sanction to Billbong High International school, S.N.169/170 Malwadi Road, Hadapsar,Tal.Haveli,Dist.Pune run by Lina Ashok Foundation, Mumbai under Maharashtra Autonomous School (Establishment & Regulation) Rules 2012 ( 1 of 2013) for the year 2018-19 (From Primary to Higher Secondary, From Std.I to Std XII all faculties, English Medium (CBSE) subject to following terms & conditions.

2.2 TERMS & CONDITIONS:-

(1) The said Institution should submit the latest 7/12 extract of the land owned by the School admeasuring 500 sq. meters or copy of Sale-Deed or if it is a leased place, copy of Registered Lease Deed for 30 years (should be) submitted to the concerned Dy.Director Education within 3 months. If it is not complied with, the approval order issued to the School will stand to be canceled automatically. It is clearly mentioned in condition No.1 of the 2.2 conditions specified in Govt. The decision stated in reference No.3. The Education Officer (Primary) is authorized to see that the said condition is complied with & accordingly Education Officer

Certified Translated Copy
Wordsmith Language Solutions Pune-411030

(Primary) should get the compliance of it & submit the report to the Govt. within 3 months.

(2) The School should comply with all the provisions of the Right of Children to Free & Compulsory Education, Rules 2009 & Rules./Provisions prescribed there under from time to time.

(3) The following sanction (approval) is accorded for the year 2018-19 on compliance of all the provisions contained in Rules 2009.

(A) If the School Management has all the prerequisites necessary for establishment of School as prescribed by the Government, then it should file an application for First Sanction with Education Officer of the concerned District within one month from the commencement of Academic Year.

(B) IF the School Management is considered as eligible for the year 2018-19 vide the Government Decision and if it is not satisfying the norms and conditions prescribed by Govt.Rules, then it will be binding upon the School management to commence the School within 18 months from the date of Government Decision after ensuring the compliance of all the conditions, otherwise the permission granted will stand to be automatically cancelled.

( C) The School will have to first obtain recognition for getting NOC for affiliation from CBSE Board as per inclusive policy prescribed in Government Decision dated 20/06/2012. After obtaining such recognition as per Paragraph (10) of Government Decision from District Education Officer (Primary)/District Education Officer (Secondary)/Education Inspector, B.M.C.C. the School will apply for N.O.C. from the concerned Board to the Government Authority. The Government will issue N.O.C. after processing such application & if the School is satisfying all the norms, conditions prescribed by Government, the Government will issue N.O.C.for affiliation to the Board.

(4) The approved New School will have to abide by all the orders/procedures passed by Government and provisions of Maharashtra Autonomous School (Establishment & Regulations) Rules, 2012 ( 1 of 2013).

(5) The concerned Competent Authority should ensure that provisions of Rules 2009 have been complied with & then only initiate further action in respect of according First Permission.

(6) No change in medium, place of school etc will be allowed in future. If the School is run in the place other than the place approved by Government, the permission granted by Government will be canceled automatically.

(7) It is the responsibility of the concerned Institution approved vide UDISE to get the School enrolled in the separate Category, "Approved School on Autonomous Basis" while filling up the information in Unified District Information system for Education. (UDISE). The State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai is hereby declared as Nodal Officer for further action in this matter. Similarly, the concerned School should display a board on the main entrance of the School stating "Approved School on Autonomous Basis(CBSE)' for the information of all concerned.

(8) The recruitment of teaching & non teaching staff by approved Autonomous School should be done as per existing rules & policies of the Govt.

It is the responsibility of the Dy.Director of concerned Division to convey the said order to the concerned School within 15 days.

Signature

(R.D.Kudale)

Desk Officer, Maharashtra Govt.

Copy to :

(1) Commissioner (Education)Maharashtra State, Pune

(2) State Project Officer,Maharashtra Primary Education Council, Mumbai

(3) Director of Education (Secondary & Higher Secondary)Maharashtra Rajy, Pune

(4) Education Director (Primary), Maharashtra Rajya, Pune

(5) Divisional Dy.Director Education, Pune

(6) Education Officer (Primary/Secondary),Pune.

NOTARY RAJESH RAMAKANT NIRGUDE AREA MAH REGD. NO. 8142/2010 EXP. DT.19/07/2025 GOVERNMENT OF INDIA

TRUE COPY

RAJESH R. NIRGUDE
NOTARY GOVT. OF INDIA
P.S. HOUSE VIHAR LANE
HADAPSAR, PUNE

Certified Translated Copy — Wordsmith Language Solutions Pune-411030

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.४८१/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १३ जून, २०१९

प्रस्तावना -

१. लिना आशर फाऊंडेशन, मुंबई संचलित बिलाबाँग हाय इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. १६९/१७०, माळवाडी रोड, हडपसर, ता.हवेली, जि. पुणे या शाळेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर शाळेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासननिर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत लिना आशर फाऊंडेशन, मुंबई संचलित बिलाबाँग हाय इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. १६९/१७०, माळवाडी रोड, हडपसर, ता.हवेली, जि. पुणे ही नवीन शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून सुरू करण्यास शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने शाळेच्या प्रस्तावित ठिकाणचा संस्थेच्या मालकीचा ५०० चौ.मी. एवढ्या जमिनीबाबतचा ७/१२ चा अद्ययावत उतारा किंवा खरेदीखत किंवा जागा भाडेकरारावर (लीज) असल्यास ३० वर्षे कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. या बाबींची पूर्तता न केल्यास सदर शाळेचे मान्यता आदेश आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

Shruti

Billabong High International School Hadapsar

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे <u>बंधनकारक</u> राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढशाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता <u>" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"</u>असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

१३.०६.२०१९

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे

Billabong High International School
Hadapsar